# जनसंपर्क अधिकारी

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस आयुक्त मिरा-भाईदर, वसई-विरार**
**यांचे कार्यालय**

राष्ट्रसंत आचार्य श्री पदमसागर सुरश्वरजी भवन, सेक्टर ५, रामनगर,
शांती गार्डन, मिरा-रोड (पुर्व), ठाणे-४०११०७
फोन नंबर ०२२-२९४५१००१
Email ID :- *pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in*


प्रेस नोट क्रमांक ५६ दिनांक १२/०३/२०२१

## *प्रेस नोट*

## यु टयुब वरुन विना चावी मोटार सायकल चोरी करण्याचे प्रशिक्षण घेवुन मोटार सायकल चोरी करणाऱ्या ४ आरोपींना माणिकपुर पोलीस ठाणे यांनी अटक करुन १२ दुचाकी वाहने हस्तगत

माणिकपूर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाने सापळा रचुन मोटार सायकल चोरी करणाऱ्या चार आरोपींना अटक केली असुन त्यांनी यु टयुब वरुन मोटार सायकल चोरी करण्याचे प्रशिक्षण घेवुन मोटार सायकल चोरी करत असल्याचे सांगितले आहे. सदर आरोपींना अटक करुन वेगवेगळया गुन्हयातील एकुण १२ मोटार सायकल माणिकपुर पोलीस ठाणे येथे जप्त करण्यात आल्या आहेत. अटक आरोपी नामे १) रॉबीनसन पीटर लोपीस, वय ३४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. रुम नं. २९२, वसई निर्मळ रोड, आंबेडकर नगर, डोंगरी, भुईगाव, वसई गाव, ता. वसई, जि. पालघर २) रोशन भरत तिवारी, वय २७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. रुम नं. ६०२, भुमी बिल्डींग, पवित्रधाम सोसायटी, टिवरी गाव, नायगाव पुर्व, ता. वसई, जि. पालघर ३) नवीन राजेश मिश्रा, वय २४ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. रुम नं. २०३, धारा बिल्डींग, पवित्रधाम सोसायटी, टिवरीगाव, नायगाव पुर्व, ता. वसई, जि. पालघर व ४) धनंजय तारकेश्वर गोस्वामी, वय १८ वर्षे, धंदा- मजुरी, रा. रुम नं. ६०४, भुमी बिल्डींग, पवित्रधाम सोसायटी, टिवरी गाव, नायगाव पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांच्याकडुन माणिकपुर पोलीस ठाणेमधील ०६, तुळींज पोलीस ठाणेतील २, वालीव पोलीस ठाणेतील २, नालासोपारा पोलीस ठाणे व विरार पोलीस ठाणेतील प्रत्येकी १ असे एकूण १२ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, वसई, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग व श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन सानप, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पो.ह.क्र. २६५/शैलेश पाटिल, पो.ना.क्र. ४८३/धनंजय चौधरी, पो.ना.क्र. १२१७/शामेश चंदनशिवे, पो.शि.क्र. ३०१/किरण आव्हाड, पो.शि.क्र. ६१२/गोपाळ कोळेकर व पो.शि.क्र. २८१/हेमंत कोरडे यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner